# जाहिरात

## महाराष्ट्र शासन

## वनविभाग

## प्रादेशिक निवड समिती - मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावती

## सरळसेवा वन निरीक्षक भरती वर्ष २०१५

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील विशेष व्याघ्र संरक्षण दलातील गट-क संवर्गातील वन निरिक्षकांची रिक्त पदे अनुसूचित क्षेत्रातील (चिखलदरा व धारणी तालुका) स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवारांकरीता जाहीरात

जाहिरात क्रमांक कक्ष-१/आस्था/वन.नि.भ.प्रकी./ २८० / दिनांक १० जुन २०१५
(अर्ज फक्त ONLINE पध्दतीनेच स्विकारण्यात येतील)

मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत विशेष व्याघ्र संरक्षण दलाची स्थापना करण्यासाठी शासन निर्णय महसूल व वनविभाग क्रमांक डब्ल्यूएलपी-०२१४/प्र.क्र.४१/फ-१/ दिनांक २२ एप्रिल २०१५ अन्वये, नव्याने निर्माण करण्यात आलेली वन निरीक्षक या संवर्गातील पदासाठी सरळसेवेने भरतीसाठी अमरावती जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रातील ( चिखलदरा व धारणी तालुका) स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकडून Online पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सुचना व भरावयाचे अर्ज Maharashtra Knowledge Corporation Limited (MKCL) या संस्थेच्या forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात व आनुषंगीक सुचना काळजीपूर्वक वाचावी.

**शासन अधिसूचना क्रं आरबी/टीसी/ई-१३०१३(४)/नोटीफिकेशन-१/४७४/२०१४, दिनांक ९ जून २०१४ व सुधारीत शासन अधिसूचना क्रं आरबी/टीसी/ई-१३०१३(४)/नोटीफिकेशन-वननिरीक्षक/४०९/ दि. ०३ जून २०१५ अनुसार स्थानिक उमेदवार म्हणजे जे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई वडील किंवा आजी-आजोबा अमरावती जिल्हयाच्या संबधीत क्षेत्रामध्ये दिनांक २६ जानेवारी १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत आहेत असा.**

ऑनलाईन अर्ज करण्यासाठी वेळापत्रक

| अ.क्रं | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यन्त |
| १ | अर्ज ऑनलाईन नोंद (रजीस्ट्रेशन) करण्याचा कालावधी | ११-०६-२०१५ | २५-०६-२०१५ |
| २ | संगणकीय चालानव्दारे स्टेट बँक ऑफ ईडीया एसबीआय यांचे शाखेमध्ये सेवा शुल्क (रु.१५०/-) स्विकृतीचा कालावधी | ११-०६-२०१५ | २७-०६-२०१५ |
| ३ | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दि २७-६-२०१५ पर्यन्त भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | ११-०६-२०१५ | ३०-०६-२०१५ रात्री २३.५९वा. पर्यत |

FIELD DIRECTOR PROJECT TIGER MELGHAT Amravati Camp

वन निरीक्षक (Forest Watcher) पदाकरीता, मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या, अमरावती जिल्हातील अनुसूचित क्षेत्रातील म्हणजे धारणी व चिखलदरा तालुक्यातील गाभा क्षेत्रात (Core Area) व बफर क्षेत्रात येणा-या गावामधील स्थानिक अनुसूचित जमातींचे उमेदवार तसेच या प्रकल्पामुळे विस्थापीत झालेल्या (अमरावती जिल्हातील अनुसूचित क्षेत्रातील म्हणजे धारणी व चिखलदरा तालुक्यातील) खालील गावांमधील अनुसूचित जमातीतील उमेदवारानांच वननिरीक्षक या पदाकरीता अर्ज करता येईल.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पामुळे विस्तापीत झालेल्या गावांची नावे.

| अ.क्र. | तालुका | तालुका निहाय गावे |
|---|---|---|
| १. | चिखलदरा | कोहा, कुंड, वैराट, चुर्णी, बोरी, अमोना, नागरतास, बारुखेडा, धारगड, गुल्लरघाट, सोमठाणा (खुर्द), सोमठाणा (बु), केलपाणी, |

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील गावांची नावे.

| अ.क्र. | तालुका | तालुका निहाय गावे |
|---|---|---|
| १. | चिखलदरा | माडीझडप, रेट्याखेडा, सेमाडोह, पीली, रायपुर, बोराटयाखेडा, माखला, मेमना, परस्तलई, अढाव, ढाकणा, डोलार |
| २. | धारणी | चोपन, रोरा, मालुर, मांगीया, |

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील गावांची नावे.

| अ.क्र. | तालुका | तालुका निहाय गावे |
|---|---|---|
| १. | चिखलदरा | घाना, खंडुखेडा, चुनखडी, खडीमल, आवागड, मेहरीआम, जारीदा, कामीदा, बारुगव्हान, मारीता, सुमीता, एकताई, सिमोरी, चिलाटी, रुईपठार, सरवारखेडा, हतरु, कुही, डोमी, भुत्रुम, तारुबांदा, केली, चिखली, पाटकहु, राक्षा, भिरोजा, गडगा-भांडुम, साव-या, भांडुम, केसरपुर, दाभीया, खटकाली, अहाड, मोथाखेडा, अमोना, आमझरी, मरीअमपुर, खटकाली, चिखलदरा, शहापुर, टेटू, मोझरी, बागलिंगा, जामुननाला, लवादा, आलाडोह, पांढरी, गिरगुटी, अंबापाटी, जामली, खोंगडा, लोनाझरी (मासोंडी), भवई, वस्तापुर, कुलंगना (खुर्द), कुलंगना (बुद्रु), चिचखेडा, बोरी, करंजखेडा, बिच्छुखेडा, नवलगाव. |
| | धारणी | खोकमार, खामदा, रंगुबेली, घोकडा, हरीसाल, तांगडा, चौंराकुंड, गोलाई, बिरोटी, धुळघाट, तलई, पळसकुंडी, राणीगाव, कंजोली, चेंडो, कुंड, बोरीखेडा, बोथरा, किंन्हीखेडा. |

(टिप :- वरील गावांचे गट ग्रामपंचायती मध्ये समावेश असलेल्या, बफर क्षेत्रातील गावातील अनुसूचित जमातीमधील उमेदवारांचाच अर्ज ग्राहय राहील.)

वन निरीक्षक या पदावर नियुक्त करण्यात येणा-या व्यक्तीने वयाची चाळीस (४०) वर्ष पुर्ण केल्यानंतर सदर व्यक्ती व्याघ्र संरक्षण दलात कार्यरत राहू शकणार नाही. यापैकी वनरक्षक पदासाठी विहित केलेली शैक्षणीक अर्हता धारण करणा-या व्यक्तीस वन विभागातील वनरक्षकांच्या रिक्त पदावर (आरक्षण विचारात



FIELD DIRECTOR PROJECT TIGER MELGHAT

घेऊन) सामावून घेण्यात येईल. वनरक्षक पदाची शैक्षणिक अर्हता धारण न करणा-या व्यक्तींना वन विभागातील अन्य समकक्ष पदावर (आरक्षण विचारात घेऊन) समावून घेण्यात येईल आवश्यक भासल्यास वनरक्षक पदांच्या सेवाप्रवेश नियमात सुधारणा करण्यात येईल.

पदनाम :- वन निरिक्षक
पदसंख्या :- २७

(स्थानिक अनुसूचित जमाती प्रवर्गातील समांतर आरक्षणचा तपशिल)

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महीला | प्रकल्पग्रस्त / धरणग्रस्त | भुकंपग्रस्त | माजी सैनिक | अतिउच्च गुणवत्ता धारक खेळाडु | होमगार्ड | अंशकालीन | रोजंदारी वनमजुर | सर्वसाधारण (१ ते ८ वगळुन) | एकूण |
| ०८ | ०१ | ०१ | ०४ | ०१ | ०१ | ०३ | ०३ | ०५ | २७ |

विशेष टिप -

- उक्त पदसंख्येत व आरक्षणाच्या प्रमाणात ही जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर या संदर्भात शासनाकडून निर्गमीत होणा-या निर्देशाच्या अधीन राहून बदल होऊ शकतो.
- समांतर आरक्षणासंदर्भात मार्गदर्शक प्रचलीत शासन धोरणानुसार आरक्षण लागू राहील.
- समांतर आरक्षणामध्ये दर्शविलेल्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अनुसूचित जमातीमधील पुढील उमेदवाराचा विचार करण्यात येईल.
- कोणत्याही प्रकारचे अपंगत्व असणारे उमेदवार यांनी उपरोक्त पदाकरीता अर्ज करु नये.

१. **वेतनश्रेणी :-** (वेतन श्रेणी रु.५२०० - रु.२०२००, ग्रेड वेतन - रु.१८००)

२. **शैक्षणिक पात्रता :-** माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) किंवा शासनाने समकक्ष म्हणुन घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

३. **वयोमर्यादा :-** उमेदवार हा दि. १ जुन १९८५ पूर्वी किंवा ३१ मे १९९७ नंतर जन्मलेला नसावा.

**३.१ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम आहे.**

(एक) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्रमांक.मासैक-१०-१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२० ऑगष्ट, २०१० अन्वये "माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणुकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतका राहील."

(दोन) पात्र खेळाडुंच्या बाबत ५ वर्षापर्यत

(तिन) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्र.बैठक-२०१०/प्र.क्र.७/फ-९/मंत्रालय, मुंबई दि.१६ ऑक्टोंबर २०१२ नुसार रोजंदारी मजुरांना त्यांना वन विभागात कार्यरत आहेत तेवढया वर्षांनी वयाची अट शिथील करण्यात येईल.

(चार) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक/पअक-१००९/प्र.क्र.२००/२००९१६-अ/दि.२७-१०-२०००

FIELD DIRECTOR PROJECT TIGER MELGHAT
Amravati Camp

अन्वये, पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना समांतर आरक्षण लागू करणे व वयोमर्यादेत सवलत देणे बाबत तरतूद आहे. त्याप्रमाणे वयोमर्यादेत सवलत देणे बाबत अट शिथिलक्षम राहील.

४. **वन निरिक्षक पदासाठी शारीरिक पात्रता.**

| शारीरीक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| | | |
| उंची (से.मी. मध्ये) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापदंडानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापदंडानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

उपरोक्त शासन पत्रातील निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील परिशिष्ट-३ मध्ये महाराष्ट्र वनसेवेतंर्गत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांसाठी विहीत केलेल्या उंची व वजनाच्या तक्त्याप्रमाणे वन निरीक्षक या पदासाठीही ऊंचीच्या प्रमाणात वजन आवश्यक राहील. वैद्यकीय तपासणी करणा-या व्यक्तींच्या मागदर्शनाकरीता सर्वसाधारण नियमानुसार पुरेशी मानली जाणारी किमान सापेक्ष उंची, वजन व छातीची मोजमापे दर्शविणारा तक्ता नमुद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(अ) दूर दृष्टी आणि जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याचे खालील मानक पूर्ण करतात.

**दूरदृष्टी**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| (सुधारलेली दृष्टी) | |
| ६/६ | ६/१२ |
| किंवा | किंवा |
| ६/९ | ६/९ |

**जवळील दृष्टी**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| (सुधारलेली दृष्टी) | |
| J.१ | J.११ |

**प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.**

(ब) शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या संबंधीचा आणि शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

FIELD DIRECTOR PROJECT TIGER MELGHAT Amravati Camp

५. **निवडीची पध्दत :-**

५.१ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ते शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व विशेष सुट करीता विहीत मापदंड इत्यादीची पूर्तता करतात किंवा कसे, याची शहानिशा करण्यात येईल.

५.२ जे उमेदवार शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादेची अट, उक्त पदाकरीता पात्रता पूर्ण करीत असतील अश्याच उमेदवारांची शारीरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल. पुरुष व महिला उमेदवारांकरीता सर्व प्रथम अनुक्रमे ५ कि.मी./३ कि.मी. ची धावण्याची चाचणी व पुढील टप्प्यात अनुक्रमे २५ कि.मी. व १६ कि.मी. चालण्याची चाचणीचा समावेश राहील. धावण्याची चाचणी कमाल ३० मिनिटात व चालण्याची चाचणी कमाल ४ तासात पूर्ण करणे आवश्यक राहील. या प्रयोजनार्थ उमेदवारांनी खालील प्रपत्रात शासकिय वैद्यकीय अधिकारी कडून शारीरीकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. उक्त प्रमाणपत्र सादर न करणा-या उमेदवारांचा भरतीमधील पुढील प्रक्रीयेकरीता विचार केला जाणार नाही.

**वन निरीक्षक भरती - २०१५**

**शारीरिकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र**

उमेदवारांचे छायचित्र

प्रमाणित करण्यात येत आहे की, श्री/श्रीमती -- - - - - - - - - - -- - - - -- - -

राहणार मु पो. - - - - - - - - - - - - -ता.- - - - - - - - - - - जिल्हा - - - - - -- - -- - - हे मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावती वनवृत्ताचे वननिरिक्षक भरती २०१४ मधील **धावण्याचे चाचणीकरीता** आवश्यक असलेले पुरुष ५ कि.मी. /महिला ३ कि.मी. ३० मिनिटात पूर्ण करणे व **शारीरीक क्षमता चाचणी** करीता आवश्यक पुरुष २५ कि.मी./ महिला १६ कि.मी. ४ तासामध्ये पूर्ण करणेस शारीरिकदृष्टया सुदृढ आहेत.

दिनांक :

ठिकाण

शासकिय वैद्यकिय अधिका-याचे नांव

पदनाम व शिक्का

५.३ धावण्याची चाचणी पुरुष उमेदवारांनी ५ किमी व महिला उमेदवारांनी ३ किमी जास्तीत जास्त ३० मिनीटामध्ये पूर्ण करणे आवश्यक राहील. उक्त धावण्याची चाचणी स्पर्धात्मक स्वरुपाची व बाद पध्दतीची असेल. धावण्याचे चाचणीमध्ये प्रथम येणारे पदसंख्येच्या ३ पट ऐवढे उमेदवार पुढील फेरीसाठी पात्र ठरविण्यात येतील. उमेदवारांची संख्या निश्चित करतांना विहीत करण्यात आलेले आरक्षणही विचारात घेण्यात येईल. उक्त चाचणीत -

१. पहिल्या येणा-या ३ उमेदवारास (क्रमांक १ ते ३ वरील आलेले) यांना प्रत्येकी -१० गुण
२. त्यानंतर येणा-या ५ उमेदवारास (क्रमांक ४ ते ८ वरील आलेले) यांना प्रत्येकी -८ गुण
३. त्यानंतर येणा-या ७ उमेदवारास (क्रमांक ९ ते १५ वरील आलेले) यांना प्रत्येकी -६ गुण
४. त्यानंतर येणा-या १० उमेदवारास (क्रमांक १६ ते २५ वरील आलेले) यांना प्रत्येकी -४ गुण
५. त्यानंतर येणा-या १५ उमेदवारास (क्रमांक २६ ते ४० वरील आलेले) यांना प्रत्येकी -२.५ गुण

याप्रमाणे गुणांचे भारांकन करण्यात येईल.

FIELD DIRECTOR PROJECT TIGER MELGHAT Amravati Camp

५.४ शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या टक्केवारीचे ८७.५ % भारांकन व उर्वरित १२.५ % भारांकनाकरीता उक्त परिच्छेद क्रं. ५.३ मधील धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण याची बेरीज करुन उमेदवाराची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

**उदाहरणार्थ** :- श्री "अ" या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता परिक्षा ( माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा ) मध्ये एकूण निर्धारित ६०० गुणापैकी ३६० गुण प्राप्त केले आहे. त्यांची टक्केवारी ६०% येईल, त्यांचे ८७.५ % भारांकन म्हणजे ५२.५० ऐवढे येईल. तसेच ५ कि.मी / ३ कि.मी. धावण्याच्या चाचणी परिक्षेत समजा तो ७ व्या क्रमांकावर आलेला आहे, तर उर्वरित १२.५% भारांकन करीता ८ गुण मिळतील. याप्रमाणे गुणवत्ता यादी करीता त्यास वरील परिच्छेद क्रं ५.३ मधील सुत्रानुसार त्यांना मिळणारे गुण = ५२.५० + ८ = ६०.५० % अशा प्रकारे गणना केली जाईल.

५.५ उक्त चाचणीमधून पुढील पात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांचे ते विहीत शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा व विशेष सुट करिता दावे इ. चे बाबीची पूर्तता करतात किंवा कसे याची शहानिशा करण्यात येईल.

५.६ सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारीरीक पात्रता धारण करतात किंवा कसे, हे निश्चीत करण्याच्या दृष्टीने उमेदवारांची मोजमापे स्थानिक शासकीय वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात येतील.

५.७ शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादेची अट व शारीरीक पात्रता धारण करणारे आणि उपरोक्त प्रथम धावण्याची चाळणी मधून पुढील टप्प्यासाठी पात्र उमेदवारांची शारीरीक क्षमता चाचणी खालीलप्रमाणे घेण्यात येईल.

वन निरीक्षकांचे कार्यक्षेत्र हे भौगोलिकदृष्ट्या अतिदुर्गम भागात आहे. वन निरीक्षक हे वन विभागातील क्षेत्रीय स्तरावरील आघाडीवरील (Front Line Staff) पद असून वननिरीक्षकाने वनसंरक्षणाच्या दृष्टीने वनक्षेत्रात पायी फिरून गस्त घालणे आवश्यक आहे. त्यामुळे शासन निर्णय महसूल व वनविभाग क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.३० जुलै, २०११ अन्वये **पुरुष उमेदवारांना २५ कि.मी. चालणे व महिला उमेदवारांना १६ कि.मी. चालणे ४ तासात पूर्ण करणे अनिवार्य राहील.** जे उमेदवार सदरची शारीरिक क्षमता ४ तासात पूर्ण करणार नाहीत. असे उमेदवार निवडीस पात्र ठरणार नाहीत, तसेच उक्त चाचणीसाठी वेळापत्रकानुसार विहीत केलेल्या दिनांकास कोणत्याही कारणास्तव अनुपस्थित राहणारे उमेदवार निवडीस पात्र ठरणार नाहीत.

५.८ शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादेची अट, शारीरिक पात्रता धारण करणारे आणि वरील परिच्छेद ५.७ मधील उल्लेखीत शारीरिक क्षमता चाचणी नंतर पांत्र ठरलेले उमेदवारांची अंतिम निवड सूची तयार करण्यात येईल.

५.९. अंतीम निवडसूचीतील उमेदवार नियुक्ती/पदस्थापनेचे आदेशानुसार वन निरीक्षक पदावर रुजू न झाल्यास किंवा सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जात प्रमाणपत्र पडताळणी किंवा अन्य कोणतेही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास, अश्या उमेदवाराचे नियुक्ती आदेश रदद करुन निवडसूचीतील प्रतिक्षा यादीवरील जेष्ठतेनुसार पुढील उमेदवारास नियुक्तीबाबत संधी देण्यात येईल.

६. उमेदवारांनी **ONLINE** पध्दतीने अर्जानुसार सेवाशुल्क खालीलप्रमाणे भरणा करावे.

| प्रवर्ग | शुल्क |
|---|---|
| स्थानिक अनुसूचित जमाती | रु. १५०/- (अक्षरी रु एकशे पन्नास) |
| माजी सैनिक | नाही |

FIELD DIRECTOR PROJECT TIGER MELGHAT Amravati Camp

ONLINE पध्दतीने प्राप्त केलेली सेवा शुल्काची चालान **भारतीय स्टेट बॅंकेच्या** च्या कोणत्याही शाखेमध्ये जाऊन भरणा करावी व चालानची प्रत अर्जदाराने जपून ठेवावी. वनविभागाने मागणी केल्यास ती सादर करणे आवश्यक राहील.

७. **अर्ज करण्याची पध्दत :-**

७.१ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना MKCL या संस्थेच्या forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विहीत केलेला नमुना अर्ज सदर संकेत स्थळावर उपलब्ध होईल.उमेदवार त्यांचा अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी एमकेसीएल,पूणे यांच्या अधिकृत केंद्राची मदत व मार्गदर्शन घेवू शकेल. अधिकृत प्रशिक्षण केंद्राची (ALC- Authorised Learning Center) पत्त्यासह माहिती forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर दिलेल्या दिशा निर्देशानुसार उमेदवारानी अर्ज करावा.

७.२ नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्ज क्रमांक (Application Form No.) व पासवर्ड (Password) काळजीपूर्वक स्वत:कडे पुढील प्रक्रियेसाठी जपून ठेवावा.

७.३ यानंतर नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने प्रिंट चालान (Print Challan) या बटनावर क्लिक करुन प्रिंट करावे.

७.४ बॅंक चलानावर नमुद केलेली फी स्टेट बॅंक ऑफ इंडिया यांचे शाखेमध्ये जाहिरातीत दिलेल्या मुदतीचे आंत कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील. व त्यांची एक प्रत स्वत:कडे जपून ठेवावी. फी भरण्यासाठी बॅंकेने आकारलेले शुल्क उमेदवाराने बॅंकेत भरावे.

७.५ बॅंकेत फी भरल्यानंतर उमेदवाराने आपला उर्वरीत अर्ज १ दिवसानंतर भरावा. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवारांने स्वत:चा अद्यावत (Latest) फोटो व स्वत:ची स्वाक्षरी विहीत पध्दतीने स्कॅनरवरुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

७.६ उमेदवाराने संपूर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट दोन प्रतीत काढून ती स्वत:कडे ठेवावी व त्यापैकी एक प्रत शारीरीक तपासणीचे वेळेस ओळखपत्रासह सादर करावी. आधार कार्ड,पॅनकार्ड,ड्रायव्हींग लायसन्स किंवा वोटर आयडी यापैकी एक पूरावा सोबत आणणे आवश्यक आहे.

७.७ वरील सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर उमेदवार पुढील प्रक्रियांसाठी पात्र होईल. उमेदवारांच्या माहिती व मदतीकरीता एमकेसीएल पूणे यांच्या कॉल सेंटर वरील कॉल सेंटर क्रं ९३२६५५२५२५ वर उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

७.८ निवड प्रक्रीयेतील विविध टप्पे पुढिल प्रमाणे राहतील.
१. पुरुष व महिला उमेदवराकरीता अनुक्रमे ५ कि.मी. व ३ कि.मी.धाव चाचणी.
२. धावचाचणीनंतर पात्र ठरलेल्या उमेदवरांची शारीरीक पात्रता व प्रमाणपत्र तपासणी
३. टप्पा २ पुर्ण केलेल्या पुरुष व महिला उमेदवरांची अनुक्रमे २५ कि.मी. व १६ कि.मी. चाल चाचणी.

**→ भरतीचे प्रत्येक टप्प्यावरील माहिती forest.erecruitment.co.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात येईल, याकरीता उमेदवारांनी वेळोवेळी ही वेबसाईट तपासावी.**

८. **सर्वसाधारण अटी :**

८.१ उमदेवार हा महाराष्ट्र राज्याचा मेळघाटातील अनुसूचित क्षेत्रातील कायमचा रहीवाशी असावा.

८.२ सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार संबधीत संवर्गातील उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहिता व बोलता येणे आवश्यक आहे.

FIELD DIRECTOR PROJECT TIGER MELGHAT

८.३ रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यलय इ. कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांना देखीले विहित केलेल्या Online पध्दतीप्रमाणे अर्ज सादर करणे बंधनकारण राहील.

८.४ पडताळणी अंती अर्ज रद्य ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे, जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार प्रादेशिक निवड समितीने राखुन ठेवले आहेत.

८.५ सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

८.६ उमेदवारांना शारिरीक क्षमताचाचणी परिक्षा व ईतर बाबीकरीता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

८.७ वन निरीक्षक पदे भरण्याकरीता प्राध्यान्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

१. व्याघ्र प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या गावामधील उमेदवार
२. व्याघ्र प्रकल्पामुळे गाभा क्षेत्रातील गावामध्ये रहिवासी असलेले उमेदवार
३. व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील गावामध्ये रहिवासी असलेले उमेदवार

८.८ याकरीता उमेदवारांने संबधीत तहसिलदाराचे वरील क्षेत्रातील निवासी प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

८.९ वन निरीक्षक पदावर नियुक्त व्यक्तींचा त्या विशेष व्याघ्र संरक्षण दलामधील पदस्थापनेचा किमान कालावधी (Minimum Tenure) ३ वर्ष राहील. त्यानंतर सदर व्यक्ती राज्यातील अन्य व्याघ्र प्रकल्पामधील विशेष व्याघ्र संरक्षण दलामध्ये बदलीस पात्र राहील. वन निरीक्षक पदावर नियुक्त व्यक्ती विशेष व्याघ्र संरक्षण दला व्यतिरिक्त अन्यत्र बदलीस पात्र राहणार नाही.

८.१० समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर आरक्षणाची पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन भरण्यात येईल.

८.११ सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

८.१२ खेळाडुंचे आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार राहील. खेळाडू वर्गवारीसाठी दावा करण्या-या उमेदवारांनी त्यांचे खेळाडूची प्रमाणपत्र संचालक, क्रिडा व युवक संचालनालय, पुणे यांच्याकडून प्रमाणित करुन ठेवावीत.

## ०९. भरती बाबत अर्जदारासाठी इतर आवश्यक सूचना :-

९.१ उमेदवाराने जाहिरात काळजीपर्वूक वाचावी.

९.२ वन निरीक्षक पदाकरीता अर्ज मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात (Core Area) व बफर क्षेत्रात येणा-या गावामधील रहिवासी उमेदवार तसेच या प्रकल्पामुळे विस्थापीत झालेल्या गावामधील उमेदवानांचा संबधीत तहसीलदाराचे सदर क्षेत्रातील निवासी प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत आवश्यक राहील.

९.३ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

९.४ उपरोक्त पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवारांसाठी सक्षम प्राधिका-यांनी जारी केलेले जातीचे प्रमाणपत्र पडताळणीचेवेळी सादर करणे आवश्यक राहील, तसेच संदर्भात शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र/बीसीसी/२०११/प्रक्र-१०६४/२०११/१६ब/दिनांक १२-१२-२०११ मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आंत सक्षम प्रधीका-याकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन नियुक्ती प्राधीका-याकडे सादर करणे अनिवार्य राहील, अन्यथा दिलेली नियुक्ती रदद करण्यात येईल.

९.५ उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी रद्द ठरविली जाईल.

९.६ निवड झालेल्या उमेदवारांना मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत ग्रामीण, दुर्गम व अतिदुर्गम क्षेत्रात कोठेही नियुक्ती होऊ शकते.

९.७ पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिकदृष्टया इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही व त्या बाबतची कोणत्याही स्वरुपाची नुकसान भरपाई देय राहणार नाही.

९.८ ONLINE पध्दतीने उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी नमुद केल्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र नसल्याचे निदर्शनास आल्यास, तसेच अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळल्यास निवड प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल किंवा नियुक्ती दिल्यानंतरही तसे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यानंतर याबाबत उमेदवारांची कोणत्याही प्रकारची तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

९.९ उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी नोंद करतेवेळी काळजीपूर्वक भरावा. भरती प्रक्रीयेदरम्यान वेळोवेळी जारी केली जाणा-या सुचना SMS द्वारेही देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

९.१० पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, ऑनलाईन अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने अथवा या कार्यालयाचे संकेतस्थळावर पाठवू नये.

९.११ उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे व अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाइन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाइन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रूटी राहील्यास अर्ज संगणकाद्वारे स्वीकारला जाणार नाही, त्यामुळे उमेदवाराने अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी.

९.१२ वन निरीक्षक पदासाठी धावण्याची चाळणी चाचणी ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे तपासणी न करता घेतली जाणार असल्याने चाचणीचे आधारे उमेदवारांना निवडबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. जे उमेदवार उक्त पदाकरीता आवश्यक अर्हता व शारीरिक पात्रता पूर्ण करीत असतील, अश्यांचीच समांतर आरक्षण निहाय अंतीम निवड केली जाईल.

९.१३ भरतीसंबंधी वेळोवेळी **forest.erecruitment.co.in** संकेतस्थळावर सुचना जाहीर करण्यात येईल. उमेदवारांनी नियमितपणे संकेतस्थळावर पाहणी करावी.

९.१४ विहीत वयोमर्यादेतील ईच्छुक शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज संबंधीत विभागातील सक्षम प्राधीका-याच्या लेखी पूर्वपरवानगीने भरावे.

९.१५ अर्ज एकदा ऑनलाइन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवारांनी आवश्यक सर्व तपशील स्वत:जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

सदस्य सचिव
प्रादेशिक निवड समिती
तथा
उपवनसंरक्षक
गुगामल वन्यजीव विभाग परतवाडा.

FIELD DIRECTOR PROJECT TIGER MELGHAT